नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३९ Issue - 239 | वार रविवार दि. १८ जानेवारी २०२६ Blow- Sunday Date 18 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणताही वाद नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### मुंबई महापौरपदाबाबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली जाईल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईच्या महापौरपदाबाबत कोणताही वाद नाही महापौरपदाचा निर्णय एकनाथ शिंदे, मी आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होत असले तरी संपूर्ण देशाचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या निकालांकडे लागले होते. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. दुसरीकडे उबाठा आणि राज ठाकरे यांच्या मनसेच्या आघाडीने ७० हून अधिक जागांवर विजय मिळवला असून विरोधी बाकांवरही मजबूत उपस्थिती निर्माण केली आहे.



मुंबईत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपली ताकद सिद्ध केली आहे. तर महायुतीतील शिवसेनेने २९ जागा जिंकत सत्तेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या निकालानंतर आता मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

महापौरपदाबाबत शिवसेनेतील काही नवनिर्वाचित नगरसेवक आणि नेत्यांनी आपली अपेक्षा व्यक्त केली होती. यावर प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, त्यांनी कोणताही वाद होणार नसल्याचे स्पष्ट केले. महापौरपदाचा निर्णय एकनाथ शिंदे, मी आणि दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, असे त्यांनी सांगितले.

मुंबई महापौरपदाबाबत बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली जाईल. महापौर कोण असेल, किती काळासाठी असेल आणि सत्तेचे नियोजन कसे असेल, याचा निर्णय परस्पर समन्वयातून घेतला जाईल. कोणताही संघर्ष न करता दोन्ही पक्ष एकत्रितपणे मुंबईचे प्रशासन सक्षमपणे चालवतील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला.

## दिल्लीसह चार राज्यांत सतर्कतेचा इशारा; २६ जानेवारीआधी सुरक्षायंत्रणा अलर्ट मोडवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर देशाची राजधानी दिल्ली तसेच हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांमध्ये सुरक्षेचा इशारा देण्यात आला आहे. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या इनपुटनुसार, २६ जानेवारीपूर्वी देशविरोधी कारवायांचा धोका लक्षात घेता सुरक्षा यंत्रणा अधिक सावध झाल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बंदी घालण्यात आलेल्या खलिस्तानी गटांशी तसेच शेजारील देशातील काही कट्टरपंथी संघटनांशी संबंधित नेटवर्क सक्रिय असल्याचे संकेत मिळाले आहेत. काही आंतरराष्ट्रीय हँडलर्स स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांचा वापर करून देशांतर्गत अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गुप्तचर अहवालात पंजाबमधील काही कुख्यात गटांचे संबंध दिल्ली-एनसीआर, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये कार्यरत असलेल्या गुन्हेगारी साखळीशी जोडले जात असल्याचा उल्लेख आहे. यामुळे या भागांतील गर्दीच्या ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याआधी नोव्हेंबर २०२५ मध्ये दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या भीषण घटनेत १५ जणांचा मृत्यू झाला होता. त्या पार्श्वभूमीवर यंदा कोणताही धोका टाळण्यासाठी सुरक्षेची पातळी अधिक वाढवण्यात आली आहे.

प्रजासत्ताक दिन संचलनापूर्वी दिल्ली पोलिसांनी राजधानीतील संवेदनशील ठिकाणी तयारीची चाचणी घेतली. कर्तव्य पथासह लाल किल्ला परिसर, कश्मीरी गेट, चांदणी चौक आणि काही प्रमुख मेट्रो स्थानकांवर मॉक ड्रिल राबवण्यात आली. या सरावाचा उद्देश संभाव्य आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देण्याची क्षमता तपासणे आणि नागरिकांमध्ये जागरूकता वाढवणे हा असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## राज्यातील २९ महापालिकांचा निकाल लागताच मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० मोठे निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (१७ जानेवारी) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १० महत्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १ हजार ९०१ पदांच्या आकृतीबंधास व संचालनालयाचे नाव अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय करण्यास मान्यता. जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम, नक्षलवाद विशेष कृति आराखडा कक्ष यांच्या कार्यालयांसाठी आवश्यक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतीबंध. (नियोजन विभाग)

अटल बिहारी वाजपेयी शिवडी- न्हावाशेवा अटल सेतूच्या पथकरात आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय. वाहनधारकांना दिलासा (नगर विकास विभाग)

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा - २ (एमयुटीपी -२) साठी सुधारित खर्चास व शासन हिस्सा उचलण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग)

तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी दिलेल्या उलवे येथील भुखंडासाठीचे शुल्क माफ (नगर विकास विभाग)

पीएम - ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या एक हजार ई- बस सुविधेसाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता. पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबीट मॅन्डेंट (डीडीएम) द्वारे संबंधित कंपन्यांना खर्चाची रक्कम मिळणार ( नगर विकास विभाग)

भाजीपाला निर्यातीकरिता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव (ता. भिंवडी ) येथे सर्वोपयोगी - मल्टी मॉडेल हब व टर्मिनल मार्केटची उभारणी. त्यासाठी राज्य कृषि पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून देणार. व्हेपर हिट ट्रीटमेंट, प्लँट विकीरण, पॅक हाऊस सुविधा तसेच फळे- भाजीपाला साठवणुकीकरिता सुविधांची उभारणी (महसूल विभाग)

यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटींची मान्यता. प्रकल्पामुळे पाच तालुकयातील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनवर्सनाचा प्रश्न मार्गी (जलसंपदा विभाग)

मुंबईतील पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थाने उपलब्ध होणार. मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी. मुंबई शहर व उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने बांधली जाणार. ( गृह विभाग)

राज्यातील युवकांना परदेशातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था (महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलीटी अँण्ड अँडव्हान्समेंटस् - महिमा) स्थापन करण्यास मंजुरी. प्रशिक्षित, कुशल युवकांना जगभरातील रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी समन्वय व अमंलबजावणीसाठी संस्था काम करणार. (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता. महामंडळाला मुख्यालयाची व बहुउद्देशीय इमारत उभी करता येणार. ( नगर विकास विभाग)

## शिवसेनेचे मुंबईतील २९ नगरसेवक हॉटेलमध्ये मुक्कामी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशाचं लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेचा निकाल लागला अन् गुवाहाटीत गाजलेल्या काय झाडी काय डोंगर या शहाजीबापूंच्या फेमस डॉयलॉगची आठवण झाला. शहाजीबापूंची आज अचानक आठवण येण्याचं कारण म्हणजे, मुंबई महापालिकेच्या निकालानंतर एकनाथ शिंदेंनी उचलेलं पाऊल. मुंबई महापालिकेत सत्ता स्थापन होईपर्यंत, शिवसेनेच्या नवनिर्वाचित २९ नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एन्ड या पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे, एकनाथ शिंदेंना मुंबईतले शिवसेनेचे नगरसेवक फुटण्याची भीती वाटतेय का? एकनाथ शिंदेंना नेमका कुणावर भरवसा नाही? मुंबईत ठाकरेंना महापौर बसवणं शक्य होईल? यासह अनेक प्रश्नांना जन्म घातलाय तो एकनाथ शिंदेंच्या हॅाटेल पॉलिटिक्स निर्णयाने.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत महायुती म्हणून एकत्र लढलेल्या भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला मोठं यश मिळालं. मात्र, यातलं मोठं यश फक्त भाजपलाच मिळालं असून शिंदेंच्या शिवसेनेला केवळ २९ जागा जिंकता आल्या. मात्र, तरीही मुंबईत निवडून आलेल्या शिवसेना नगरसेवकांचा मुक्काम हॉटेलमध्ये हलवण्यात येत आहे. मुंबई महापालिकेत सत्ता स्थापन होईपर्यंत, शिवसेनेच्या २९ नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एन्ड या पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवण्यात येणार आहे. मुंबई महापालिकेत शिवसेनेच्या नगरसेवकांची बेरीज केल्याशिवाय, भाजपप्रणित महायुतीला ११४ ची मॅजिक फिगर गाठणं शक्य नाही.



महायुतीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ठाकरे बंधू शिवसेनेचे नगरसेवक फोडू शकतात, अशी भीती एकनाथ शिंदेंना सतावत असल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. याच भीतीपोटी एकनाथ शिंदेंनी त्यांच्या मुंबईतल्या नगरसेवकांचा मुक्काम हॉटेलमध्ये हलवल्याचं बोललं जातंय.

एकनाथ शिंदेंचं टेन्शन का वाढलं असावं? या प्रश्नाचं उत्तर देताना उद्धव ठाकरेंनी केलेलं ॲनालिसीसही विचार करण्यासारखंच म्हणावं लागेल. फोडून आलेली माणसं टिकवण्याचं टेन्शन, कदाचित त्यांना भाजपची भीती वाटतेय, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी यॉर्करचा मारलाय. उद्धव ठाकरेंनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर एकनाथ शिंदे उत्तर देणार का? याकडे सगळ्यांचं लक्ष असेलच, मात्र तूर्तास देवेंद्र फडणवीसांनी महायुतीचे कॅप्टन म्हणून लगेच उत्तर दिलंय. कुठलीही पळवापळवी होणार नाही, असे फडणवीसांनी स्पष्ट केले.


मॅजिक फिगर गाठली नसली तरी मुंबईत महापौर बसवण्याची उद्धव ठाकरेंची इच्छा कायम आहे, आणि ही इच्छा त्यांनी दिवसभरात दोनदा बोलून दाखवली. मुंबईत महायुतीचा महापौर बसणारय हे तर निकालांवर स्पष्ट झालंय. तो महापौर मराठीच असेल असं खुद्द फडणवीसांनी वारंवार सांगितलंय. पण, गेल्या २५ वर्षांत पहिल्यांदाच मुंबईचा महापौर शिवसेनेचा नसणार आहे. त्यावरूनच ठाकरेंचे शिलेदार संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंबद्दल आतापर्यंत न बोलून दाखवलेली सल पहिल्यांदा बोलून दाखवलीय. फुटीरवादी राजा थेट जयचंद असा नामोल्लेख संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंचा केलाय.

भाजपनं मुंबई काबिज करण्याचं स्वप्न अखेर पूर्ण केलंय पण शिंदेंच्या मदतीनंच भाजपचा पहिला महापौर मुंबईत विराजमान होणार आहे. त्यामुळेच ठाकरेंपेक्षा कमी असले तरी शिंदेंचे २९ नगरसेवक गेमचेंजर ठरणार आहेत. म्हणूनच की काय गुवाहाटीचा अनुभव असलेल्या शिंदेंना आपल्या २९ नगरसेवकांना हॉटेलमध्ये मुक्कामासाठी पाठवावं लागतंय. याशिवाय, शिंदेंकडून दवाबाचं राजकारण केलं जातंय का, महापौर किंवा स्थायी समिती सभापतीपदासाठी तर हे हॉटेल पॉलिटिक्स नाही ना, असाही प्रश्न राजकीय जाणकरांना पडलाय.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर हल्लाबोल

शिवसेना भवनचा वॉर्ड जिंकून आणला

## मुंबईचा महापौर आमचा व्हावा ही आजही इच्छा : उद्धव ठाकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २९ महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. मात्र, यंदाच्या निवडणुकीत मी सर्व महापालिकामध्ये प्रचारला जाऊ शकलो नाही. चंद्रपूरमध्ये शिवसेनेचे नगरसेवक जिंकून आले, परभणीमध्येही आम्हाला चांगलं यश मिळालं आहे. मुंबईसह महाराष्ट्रात शिवशक्तीला ज्यांनी ज्यांनी मतदान केलं त्यांचे धन्यवाद करतो, आभार मानतो, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी मुंबई महापालिकेतील निकालावर समाधान व्यक्त केले आहे. तसेच, अत्यंत घाणेरड्या पद्धतीने ही निवडूक झाली, साम-दाम-दंड-भेद विसरुन त्यांनी निवडणूक लढवली. मुंबईमध्ये आमचा महापौर व्हावा ही इच्छा होत, आजही आहे. पण, आम्ही बहुमताचा आकडा गाठू शकलो नाही. मात्र, आमच्या यशाने सर्वांना घाम फोडला, असेही ठाकरेंनी म्हटले.

विधानसभेला शिवाजी पार्कवर त्यांच्या खुर्च्या रिकाम्या होत्या, आत्तासुद्धा आमच्या सभेला शिवाजी पार्क फुलून गेलं पण त्यांच्या सभेला गर्दी नव्हती. मग, आमच्या सभेला गर्दी होते पण मतं मिळत नाही, यांना रिकाम्या खुर्च्यांनी मतदान केलं का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. शिवसेना संपवण्याचा त्यांनी पूर्ण प्रयत्न केला, आमचे अर्धे आमचे नगरसेवक त्यांनी गळाला लावले पण आता ते गाळात गेलेआहेत. भाजप पक्ष हा कागदावर आहे पण जमिनीवरती नाही, माझे नगसेवक जे निवडून आले ते साधे आहेत. मुंबईकराकडून आम्हाला जास्त अपेक्षा होती, भरघोस आशीर्वाद देतील असं वाटलं होतं. आम्हाला मोठा आशीर्वाद दिला नसला तरी जे आशीर्वाद दिले ते ठीक आहेत, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी निकालावर समाधान व्यक्त केलं.

मुंबई महापालिकेमध्ये आमचे लोकप्रतिनिधी जातील, यांनी तिजोरी कशी खाली केली याचा भांडभोड मुंबई करांशी आमचे प्रतिनिधी करतील. देवाची इच्छा असेल तर महापौर आमचा होईल, मेवाची नाही, थोडा फार फरक आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी नाव न घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला.

हॉटेलमध्ये ठेवलेले नगरसेवक जे निवडून आलेले आमचे किती आहेत? त्यांना विचारा हॉटेलमध्ये का ठेवलं. आता, फोडणाऱ्यांना आपले लोक फुटण्याची भीती आहे, असे म्हणत एकनाथ शिंदेंना टोला लगावला. त्यांचा विजय डागाळलेला आहे, ज्यांची मदत घेऊन महापौर बसत आहे, त्यांना लाज वाटली पाहिजे. गद्दार लोकांनी विचार केला पाहिजे, आपण काय करतोय. बाळासाहेबांची शिवसेना म्हणताय, त्यांचे विचार घेऊन तुम्ही जाताय, अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला.

शिवसेना भवन वॉर्ड आम्ही जिंकून आणला, मनसे शिवसेना कोणाला कोणाची मदत झाली असं नाही. आम्ही एक दिलाने लढलो, राज ठाकरेंसोबत जिल्हा परिषद निवडणूक लढवायला काय हरकत आहे? एकत्र आलो एकत्र राहण्यासाठी मी आधीच बोललो, असे म्हणत शिवसेना-मनसे युतीवरही उद्धव ठाकरेंनी भाष्य केलं.

काँग्रेसचे उमेदवार निवडून आले तर चांगलं आहे, तुमच्यासोबत असते तर म्हणजे आत्याला मिशी का नाही? असं विचारण्यासारखं आहे, असे म्हणत जर तर च्या प्रश्नावर काय बोलावं असं उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबईत आमचे ५४ नगरसेवक फोडले, तरीही आमचे ६५ नगरसेवक निवडून आले आहेत. आता, २१ आणि २२ तारखेला सुनावणी आहे, पक्ष आणि चिन्ह निर्णय होईल. त्यावेळी, जर पक्ष चिन्ह यांचं गेलं तर काय अस्तित्व राहिल? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला.

दैनिक
**यश सिद्धि न्यूज**



## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त धनश्री परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ व आदर्श युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त धनश्री व सिताराम परिवाराच्या वतीने रविवार दिनांक १८ जानेवारी रोजी धनश्री महिला पतसंस्था, शाखा मार्केट यार्ड पंढरपूर रोड, मंगळवेढा येथे सकाळी दहा ते सायंकाळी चार वेळीत भव्य रक्तदान शिबिर व महिला युवतींसाठी हिमोग्लोबिन तपासणी औषधे वाटप शिबिराच्या आयोजन करण्यात आले असल्याची माहिती धनश्री व सित- ाराम परिवाराची संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी दिली आहे याप्रसंगी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्य जयंतीनिमि त्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे विविध रुग्णालयामध्ये रक्तपिढ्यांना रक्त साठा कमी पडू लागला आहे. तरुणांमध्ये रक्तदानाची महत्त्व रुजवणे आणि त्यांना रक्तदानासाठी प्रेरित करण्याच्या अनुषंगाने धनश्री व सिताराम परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बऱ्याच रुग्णांना वेळेवर रक्तांना मिळाल्यामुळे आपले प्राण गमवावे लागते. त्यामुळे शिबिरास उपस्थित राहून लोकांनी अधिकाधिक रक्तदान करावे असे आव्हान धनश्री व सिताराम परिवाराची संस्थापक प्रा. शिवाजीराव काळुंगे यांनी केले आहे.

# रुग्णसेवेतून साकारले देवदूतपण; डॉ. रोहित धोक्रट यांच्या तत्परतेमुळे पत्रकारास मिळाले नवे जीवन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

आजच्या धावपळीच्या युगात जिथे माणुसकी दुर्मिळ होत चालली आहे. तिथे निफाड येथील श्री.साई मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल चे संचालक डॉ. रोहित धोक्रट यांनी आपल्या तत्पर निस्वार्थ व संवेदनशील रुग्णसेवेने पुन्हा एकदा देवदूत ठरण्याचा अनुभव दिला आहे. त्यांच्या वेळीच घेतलेल्या निर्णायक पावलांमुळे एका पत्रकाराचे प्राण वाचले. असून संपूर्ण पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. रुग्ण सेवा हीच ईश्वरसेवा मानत रुग्णांच्या सेवेसाठी २४ तास उपलब्ध असणारे डॉ. रोहित धोक्रट यांचे नाव घेतले जाते.

नाशिक स्टार न्युजचे प्रतिनिधी व उपेक्षित नायकचे सहसंपादक मुकुंद आव्हाड हे दिनांक ८ जानेवारीपासून



डॉ. रोहित धोक्रट
श्रीसाई मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, निफाड



डॉ. चेतन जैन

त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पौषवारी निमित्त पंचक्रोशीतील विविध गावातून निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याचं वृत्तांकन करीत होते. श्रद्धा, सेवा आणि पत्रकारितेच्या कर्तव्यात रमलेले मुकुंद आव्हाड हे दिनांक ११ जानेवारी रोजी पायी दिंडीचे चित्रीकरण करीत असताना अचानक चक्कर येऊन कोसळले. तीव्र छातीत दुखू लागल्याने क्षणातच परिस्थिती गंभीर बनली. अत्यंत अस्वस्थ अवस्थेत त्यांना तात्काळ निफाड येथील श्री. साई मल्टी पेशालिटी हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. रुग्णांची अवस्था पाहताच डॉ. रोहित धोक्रट यांनी क्षणाचाही विलंब न करता सर्व आवश्यक तपासण्या त्यांनी पूर्णपणे मोफत करून मानवतेचा आदर्श घा- लून दिला. तपासणीतून हृदयविकाराचा धोका लक्षात येताच.....!

वेळ दवडू न देता सामाजिक कार्यकर्ते अशोकराव सदाशिव नागरे यांच्यांशी समन्वय साधत डॉ. रोहित धोकरट यांनी रुग्णाला तातडीच्या उच्च उपचारासाठी म्बुलन्स द्वारे नासिक येथील एस.आर. व्ही. राजे बहादुर हॉस्पिटल टिळक रोड, शालिमार येथे डॉ. चेतन जैन एम. बी.बी.एस.एमडी. डी.एन.बी. काडीऑलॉजी यांच्याकडे त्वरित पाठविले. योग्य वेळी घेत- लेला निर्णय आणि अचूक समन्वय यामुळे पत्रकार मुकुंद आव्हाड यांचे प्राण वाचले. या घटनेनंतर निफाड तालुक्यासह संपूर्ण पंचक्रोशीत डॉ. रोहित धोक्रट म्हणजे रुग्णांसाठी आध- ारवड अशी भावना अधिक दृढ झाली. आहे रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे तत्व केवळ शब्दात न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरवणारे डॉ. म्हणून त्यांची ओळख अधिक ठळक झाली आहे. यापूर्वीही डॉ. रोहित धोक्रट यांच्या नेतृत्वाखाली मेंदू विकारासह अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वी रित्या पार पडल्या आहेत. त्यामुळे श्री.साई मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल हे निफाड तालुक्यातील नागरिकांसाठी केवळ उपचाराचे केंद्र न राहता आपुलकीचे विश्वासाचे व हक्काचे हॉस्पिटल ठरले आहे. मानवतेचा झरा अखंड वाहत ठेवणाऱ्या अशा देवदूत डॉक्टर मुळेच समाजात अजूनही माणुसकी जिवंत असल्याची प्रचिती येते असे मत सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# मोबाईलचा वापर गरजेपुरताच करावा : राष्ट्रीय महामंत्री डॉ. वीरेंद्र सिंह सोलंकी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'विद्यार्थ्यांनी आपले जीवन मोबाईल वापराच्या चाकोरीबाहेर घालविले पाहिजे. सध्याच्या युगात म ाणूस हा सोबतच्या माणसापेक्षा हा- तातील मोबाईलकडे अधिक लक्ष देत आहे. यामुळे त्याच्या सामाजिक व म ानसिकतेवर दुष्परिणाम होत असल्याचे जाणवते आहे. मोबाईलच्या अतिवापराने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईल वा- पराचा अतिरेक न करता गरजेपुरताच वापरावा. यामुळे शारिरीक, मानसिक स्वास्थ्य जपले जाते.' असे प्रतिपादन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डॉ.वीरेंद्र सिंह सोलंकी यांनी केले.

### स्वेरीत 'स्क्रीन टाईम टू ॲक्टीव्हिटी टाईम' अभियान संपन्न

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पंढरपूरच्या वतीने गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये विद्यार्थ्यांबरोबर 'स्क्रीन टाईम टू ॲक्टीव्हिटी टाईम' या अभियानाच्या माध्यमातून संवाद साधण्यासाठी ते आले होते. सुरुवातीला माता सर- स्वती आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. वीरेंद्र सिंह सोलंकी व सोबत आलेल्या पदाधिकाऱ्यांचे स्व- ागत केले. प्रास्ताविकात पंढरपूर शहर मंत्री ऋषिकेश सातपुते यांनी स्वेरीमध्ये कार्यक्रम आयोजिन्याचे कारण स्पष्ट केले. पंढरपूरचे जिल्हा संयोजक पवन भोसले यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची वाटचाल सांगताना गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीचा लेखाजोखा मांडला. राष्ट्रीय महामंत्री वीरेंद्र सिंह सोलंकी हे मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, 'आजचा युवक हा सोशल मिडीयाच्या सहाय्याने अधिक गतीने धावत असल्याचे दिसून येत आहे. अशा स्थितीत ऑनलाईन गेम, ओटीटी व्यासपीठच्या माध्यमातून मोबाईलचा 'स्क्रीन टाईम' नाहक वाढत याहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि बौद्धिक विकास संदर्भातील समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. यासाठी जास्त वेळ मोबाईल वापरणाऱ्या विद्यार्थांना जागृत करणे, दुष्परिणाम ओळखून मोबाईल वापरापासून दूर सारणे, मैदानी खेळावर भर देणे, मैदानी खेळ खेळणे, योगा, प्राणायम यावर भर देणे, नातलग तसे गुरुजन वर्ग आणि मित्रांबरोबर गप्पा गोष्टी करणे, त्यांच्याशी संवाद साधून संस्कृती जपल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होवू शकतो तसेच आपले मन सामाजिक कार्यात गुंतवल्यास मानसिकता टिकून राहते' असे सांगून याबाबत जनजागृती कशी करता येईल हे सांगितले. संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे म्हणाले की, 'अनेक वेळेस विद्यार्थ्यांना विकासाच्या संधी उप- लब्ध होत असतात. कोरोना महाम ारीपूर्वी स्वेरी कॅम्पसमध्ये मोबाईल हा शब्द देखील नव्हता. पुढे काळानुसार ऑनलाईन अभ्यासक्रमासाठी मोबाईल वापरात आला. आता रेग्युलर शिक्षणात कुणाकडेही मोबाईल आढळत नाही. त्याच बरोबर वेळापत्रकानुसार विद्यार्थी नियमित पणे स्वेरी कॅम्पस मध्ये प्राणायम करतात.' असे सांगून मोबाईलच्या अतिप्रमाणात वापराचे तोटे सांगितले.' यावेळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे महाविद्यालय अध्यक्ष ओंकार माळी, आदित्य कदम, ओम इंगळे, आदित्य मस्के, चोपडे, अदिती भुसनर, ॲड. पाटील, आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम. एम.पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सुंदरपूर ग्रामपंचायतच्या वतीने एकल महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील ग्रामपंचायत सुंदरपूर येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून व पंचायत समिती निफाड च्या गटविकास अधिकारी श्रीमती नम्रताताई जगताप यांच्या प्रेरणेतून पतीच्या निधनानंतर पत्नीचे जोडवे काढणे,मंगळसूत्र काढणे व कुंकू पुसणे अशा अमानवी,कालबाह्य व स्त्रीच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचविणाऱ्या अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी नुकतेच.ग्राम पंचायत सुंदरपूर यांच्या वती- ने विधवा,परित्यक्त व एकल महिलांचा हळदी कुंकवाचा सो- हळा पार पडला .सदर कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी सरपंच .प्रतिक्षाताई सोमवंशी होत्या. तसेच ग्रामपंचायतीच्या आजी-म ाजी सरपंच उपसरपंच व सदस्य महिला,बचतगटाच्या अध्यक्ष सचिव , सदस्या,सीआरपी ,जि.प.शाळेच्या शिक्षीका, अंगणवाडीताई,आशाताई , गा- वातील सर्व जेष्ट श्रेष्ठ महिला व बालगोपाल,ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत दिमाखात पार पडला. तसेच सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने एकल महिलांची उप- स्थित लाभली. कार्यक्रमात सर्वच महिलांनी उखाणे घेऊन जून्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रतिक्षा ताई सोमवंशी यांनी आपले मनोगतात. मार्गदर्शन केले

विधवा महिलांचा सन्मान, आत्मसन्मान व मानवी हक्क अबाधित ठेवा,

अंधश्रद्धा व कुप्रथांना ठाम नकार द्यावा

समानता, संवेदनशीलता व सामाजिक न्यायाची जाणीव निम ाण करा.

हे केवळ प्रशासकीय नाही तर सामाजिक परिवर्तनाचे अभियान आहे.

प्रत्येक नागरिकाने, प्रत्येक कुटुंबाने आणि प्रत्येक गाव- ाने या जनजागृतीत सहभागी होणे ही काळाची गरज असुन, कुप्रथांविरुद्ध एकत्र उभे राहूया.

महिलांचा सन्मान जपूया असा मोलाचा एकल महिलांसाठी संदेश दिला

# देर्डेफाटा ते भरवस फाटा रस्त्याच्या कामावर नागरिकांची नाराजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिर्डी कडून गुजरातकडे जाणाऱ्या व येणाऱ्या साईभक्तांसाठी अतिशय महत्त्वाचा राज्यमार्ग क्र. ७ हा सिन्नर-शिर्डी मार्गावरील देर्डे फाटा ते भरवस फाटा या महत्त्वाच्या रस्त्याचे काम गेल्या जवळपास दहा महिन्यांपासून सुरू असले तरी प्रत्यक्षात मात्र या कामाची गती अत्यंत संथ असल्याने नागरिकांम ध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### काम संथगतीने सुरू असल्याने प्रवाशांचा त्रास वाढला

आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे १५६ कोटी ३१ लाख रुपये खर्चाचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास जाणार असताना सध्या मात्र अपुऱ्या नियोजनामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

हा रस्ता कोपरगाव तालुक्यातील देर्डे कोऱ्हाळे येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० पासून सुरू होत असून भरवस फाटा म ार्गे पुढे विंचूर लासलगाव देवळा ब्राह्मणवेल साळवडे असा पुढे जात असून गुजरातकडून शिर्डीकडे येणाऱ्या साईभक्तांसाठी हा मार्ग म ोठा सोयीचा ठरणार आहे. तसेच कोपरगाव तालुक्यातील धामोरी, चासनळी, वेळापूर, कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखाना, मढी, देर्डे आदी महत्त्वाच्या गावांना हा रस्ता थेट जोडतो.

मात्र सध्या मढी बुद्रुक ते सात मोऱ्या दरम्यान रस्ता अनेक ठिकाणी केवळ एका बाजूने खोदून ठेवण्यात आल्याने कामाची प्रगती सम ाधानकारक नाही, अशी तीव्र नाराजी नागरिकांतून व्यक्त होत आहे.

**हा रस्ता परिसराच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र सध्या कामाच्या संथ गतीमुळे नागरिकांना जे हाल सहन करावे लागत आहेत ते दुर्दैवी आहेत. शासनाने इतका मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे, त्याचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांचा विश्वास उडत चालला आहे. प्रशासनाने तात्काळ या प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी करावी, कामाची गती वाढवावी, अनुभवी अभियंत्यांची प्रत्यक्ष देखरेख सुरू करावी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी पर्यायी वाहतूक व्यवस्था त्वरित लागू करावी. अन्यथा हा प्रकल्प लोकांच्या नजरेत 'विकासाचा मार्ग' न राहता 'त्रासाचा महामार्ग' ठरेल.**

**– विकास चांदगुडे (स्थापत्य अभियंता, अध्यक्ष– जगदंबा पतसंस्था, चासनळी)**



रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धुळी- चे लोट उडत असून त्याचा त्रास वाहनधारक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातील रहिवाशांना सहन करावा लागत आहे. त्यातच साखर कारखान्याचा हंगाम सुरू असल्याने ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असून वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परिणामी, नागरिकांचा वेळ व इंधन वाया जात असून अपघातांचा धोका देखील वाढला आहे.रस्त्याचे काम एका बाजूने पूर्णपणे खोदून ठेवण्यात आल्याने व साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू असल्याने ऊस वाहतुकीत मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. त्यातच रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून वाहनधारक, शालेय विद्यार्थी, महिला व वृद्धांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

प्रकल्पासाठी दिलेल्या कराराची तारीख ७ फेब्रुवारी २०२५ असून काम पूर्ण करण्यासाठी २४ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यातील जवळपास अर्धा कालावधी उलटून गेला असताना कामाची प्रगती मात्र समाधानकारक नसल्याने नागरिकांम ध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहे.

अनेक नागरिकांचे म्हणणे आहे की, टप्प्याटप्प्याने खोदकाम करून आधी तळभागाचे काम पूर्ण केले असते, तर आज इतकी मोठी वाह- तूक कोंडी व गैरसोय झाली नसती. मात्र प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी किंवा अभियंते कामाच्या ठिकाणी नियमितपणे देखरेख करताना दिसत नसल्याने देखील नाराजी व्यक्त होत आहे.....

रस्त्याचे काम जलद गतीने व दर्जे दार व्हावे यासाठी योग्य ती पावले प्रशासनाने उचलणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या ऊस उत्पादकांना प्रति मेट्रिक टन रु.३००० प्रमाणे ऊस बिल अदा

## ऊस उत्पादकांची दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अखेर रु.१७०.०० कोटी बँकेत वर्ग; डॉ. यशवंत कुलकर्णी यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी सुधारणा बंद परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याला गळीत हंगाम २०२५/२६ मध्ये लाख मेट्रिक टन ऊस ७५ दिवसात गायब करून कमी दिवसात जास्तीत जास्त काळात करण्याचा उच्चांक निर्माण केला आहे. या हंगामात दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अखेर गाळात झालेल्या सर्व उत्पादकांच्या उसात प्रति मेट्रिक टन ३०००/प्रमाणे ऊस बिलाची एकूण रक्कम रु.१७०.०० कुठे आता केली आहे. कारखान्याची चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक, व्हाईस चेअरमन मा. श्री कैलास खुळे सर संचालक मंडळातील सर्व सदस्य अधिकारी कामगार यांच्या सहकार्याने कारखाना सोळीत व विना खंड चालू आहे अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी साहेब यांनी दिली.

गळीत हंगाम २०२५/ २६ मध्ये कारखान्याकडे सुमारे अकरा लाख मीटरिंग क्षेत्राच्या नोंदी आल्या होत्या त्यामधील कारखान्याने आज पर्यंत सात लाख मेट्रिक टन ऊस गाळप केला असून कारखाना स्थ-ापनेपासून कमी दिवसांमध्ये जास्तीत जास्त गाळप करण्याचा नवा उच्चांक निर्माण केला आहे त्याचबरोबर यावर्षी गाळपास येणाऱ्या उसात प्रतिमित्र रक्कम रुपये ३०००/प्रमाणे ऊस बिलाची रक्कम दिली असून पहिल्या पंधरवड्यातील राहिलेला पूज बिलाच्या परकाचे रक्कम ही अदा केले आहे त्यामुळे दिनांक ३१ डिसेंबर २०२५ अखेर गाळप आलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्व उसात प्रतिमित्र तीन हजार रुपये प्रमाणे ऊस बिलाची रक्कम दिले आहे त्याचबरोबर कारखान्याकडे तोडणी वाहतूक करणाऱ्या तोडणे वाहतूक ठेकेदाराची दिले असून कारखाना सरासरी प्रति टन १० लाख मीटर रिटर्न प्रमाणे चालत आहे. पूजा हंगामातील कारखान्याकडील उर्वरित सर्व उसाचे गाळप वेळी पूर्व करीत आहोत त्यामुळे कारखान्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा अस-लेला विश्वास आणखी दूर झाला आहे व या हंगामात कारखान्याने ६.४० लाख स्क्वेअर साखर उत्पादन करून १०. ७०% सरासरी साखर उतारा मिळवला आहे व जनरेशन मधूनही ४.२२ कोटी वीज निर्मिती करून २.२० कोटी वीज निर्मिती केली आहे आस्वामी प्रकल्पामधू-नही ६७ लाख लिटर इतके उत्पादन घेतले आहे अशी माहिती कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी साहेब यांनी दिले यावेळी कारखाने जे चेअरमन मा.आ. वसंतराव परिचारक मालक म्हणाले की स्वर्गीय सौदागर पंत परिचारक मोठी मालक त्यांनी ज्याप्रमाणे शेतकरी हिताई कामगार सुकाय हा मूलमंत्र जपला त्याप्रमाणे सातत्यपूर्ण सभासद शेतकऱ्यांची ही डोळ्यासमोर ठेवून आम्ही कार्य करीत आहोत ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत उजगाव पाच राखून ठेवून कारखान्यास उसाचा पुरवठा करावा असे आव्हान ही चेअरमन प्रशांतराव परिचारक मालक यांनी केले.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालयाचे छात्र सेवाकाल शिबिर संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन व रेणुका अध्यापक विद्यालय रेणापूर चे श्रीराम माध्यमिक व प्राथमिक शाळा रेणापूर येथे आयोजित करण्यात आलेले छात्र सेवाकाल शिबिर संपन्न झाले .या वेळी श्रीराम माध्यमिक शाळेचे अंतरवसिता मुख्याध्यापक म्हणून विश्वनाथ ढवळे, उपमुख्याध्यापक म्हणून नम्रता डोंगरे, पर्यवेक्षक म्हणून अभिषेक गिरी यांनी काम काज पाहिले .श्रीराम प्राथमिक शाळा मुख्याध्यापक म्हणून वेदांत भातीकरे , उपमुख्याध्यापक म्हणून प्रतिक्षा भोपळे,पर्यवेक्षक म्हणून प्रदीप चव्हाण यांनी काम पाहिले. छात्र सेवाकाल शिबिर समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे प्राचार्य श्री सिद्धेश्वर मामडगे यांची उप-स्थिती होती.प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक अनिल कुटवाड , प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सतीश मोरे, अमृतेश्वर स्वामी ,प्राचार्य रतन लहाने, प्र प्राचार्य उमेश रणदिवे,प्रा रमाकांत गायकवाड यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे प्रस्ताविक छात्र सेवाकाल मुख्याध्यापक विश्वनाथ ढवळे यांनी केले. अंतरवासिता शिबिराच्या यशस्वितेसाठी प्रा योगेश माने, ग्रंथपाल मनिषा लातूरकर,राधिका माने यांनी मार्गदर्शन केले. या वेळी बी एड व डी एल एड छात्र अध्यापक व शाळेतील विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारत पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन लहू मुरकुटे यांनी केले.

# विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे माघ शुद्ध १ ते ५ या कालावधीत संपन्न होणाऱ्या श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या विवाह सोहळ्याची जय्यत तयारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आली असून, वसंत पंचमी अर्थात दिनांक २३ जानेवारी रोजी परंपरेनुसार विवाह सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री रूक्मिणी स्वयंवर कथेचे आयोजन दिनांक १९ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत दररोज दुपारी ४.०० ते ६.०० या वेळेत करण्यात आले आहे. या कथेचे निरूपण श्री क्षेत्र पंढरपूर येथील प्रख्यात श्रीमद् भागवताचार्य कु. साध्वी अनुराधा (दिदी) राजेंद्र शेटे यांच्या सुमधूर व रसाळ वाणीने होणार आहे.



वसंत पंचमी दिनी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचा विवाह सोहळा विधीवत मंत्रोच्चारात संपन्न होणार आहे. पहाटे काकडा आरतीवेळी श्री विठ्ठलास सोन्याच्या मुकुटाऐवजी मंदिरातील पांढरे पागोटे परिधान करण्यात येते. या दिवसापा-सून रंगपंचमीपर्यंत श्री विठ्ठलास पांढरा पोशाख परिधान केला जातो. नित्यपूजेच्या वेळी श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेस गुलाल अर्पण करण्यात येतो.

वसंत पंचमीच्या दिवशी फक्त याच दिवशी श्री रूक्मिणी मातेस सकाळी पांढरा पोशाख परिधान करण्यात येतो.

सकाळी ११.०० वाजता श्री विठ्ठलाची तुळशी पूजा करण्यात येते. त्यानंतर श्री विठ्ठलास विवाह स्थळी येण्याचे निमंत्रण देण्यात येते. श्री रूक्मिणी मातेस पांढरा पोशाख व पारंपारिक अलंकार परिधान करून पाद्यपूजा, नैवेद्य व आरती केली जाते. दुपारी १२.०० वाजता श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मूर्ती श्री विठ्ठल सभामंडपात आणून विवाह सोहळा विधीवत पार पडतो.

त्यानंतर दुप-ारी ४.०० वाजता पोशाखानंतर पाद्यपूजा करण्यात येऊन श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी मातेच्या प्रतिकात्मक मूर्तीची सवाद्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. सदर शोभायात्रा व्ही.आय.पी. गेट - श्री संत नामदेव पायरी - महाद्वार पो-लीस चौकी - कालिका देवी मंदिर - काळा मारुती चौफाळा - नाथ चौक - तांबडा मारुती मंदिर - माहेश्वरी धर्मशाळा - महाद्वार पोलीस चौकी - पश्चिम द्वार - व्ही.आय.पी. गेट या मार्गाने निघणार आहे.

भाविकांना सोहळा पाह-ता यावा यासाठी चौफाळा व महाद्वार पोलीस चौकी येथे एलईडी स्क्रीन बसविण्यात येणार असून, विविध समाजम ाध्यमांद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांना हा सोहळा घरबसल्या पाहता येणार आहे. तसेच वसंत पंचम ीच्या दिवशी दुपारी १२.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. संदेश भोसले यांनी दिली.

# मित्राच्या घरी चोरी करणाऱ्या मित्रांना स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड; धाराशिव येथील घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अध-ीक्षक रितू खोखर, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा धाराशिव चे पोलीस निरीक्षक विन-ोद पवार यांचे आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक धाराशिव जिल्ह्या-तील मालाविषयी गुन्हे उघडकिस आणणे कामी धाराशिव शहरात पेट्रोलिंग करत असताना गुन्हे शाखा पोलीस पथकास गुप्त बातमी मिळाली की पोलीस ठाणे धाराशिव शहर गु. र. न.५७०/ २०२५ कलम३३१(४) ३०५ () बीएनएस ह्या गुन्ह्यातिल आर-ोपी स्वप्निल सतिश जेटीथोर,श्वेत सु-नील चिलवंत, निखिल किरण सोनवणे, तिघे राहणार धाराशिव यांनी केला आहे अशी माहिती मिळाल्याने पथकाने धाराशिव शहरात नमूद आरोपीचा शोध घेतला असता ते धाराशिव शहरात मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे नमूद गुन्ह्याच्या अनुसंगाने चौकशी केली असता त्याने सांगितले की सदर गुन्ह्यातील फिर्यादी शुद्धोधन गायकवाड यांनी यातील आरोपींना उसने पैसे देऊन त्याचे जास्त व्याज घेतले होते म्हणून आरोपीने संगणमत करून फिर्यादीच्या घरी कुरणे नगर येथे चोरी केली असल्याचे कबूल केले नमूद आरोपीचे ताब्यातून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकूण ७९ हजार ७८० रुपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.




सदरची कामगिरी म ाननीय पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीम ती शफकत आमना यांच्या मार्गदर्शकाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पो-लीस निरीक्षक विनोद पवार यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, पोलीस हवालदार नितीन जाधव,बबन जाधव, चालक पोलिस हवालदार मेहबूब अरब, रोहित दंडनाईक यांच्या पथकाने केली आहे.

# जि.प प्रशाला ईटकुर येथे बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा; पालकांचा व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील ईटकुर जिल्हा परिषद शाळेमध्ये बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वाता-वरणात साजरा करण्यात आला.

मुख्य म्हणजे विद्यार्थ्यां मध्ये आत्म विश्वास, व्यवहारीकज्ञान, हे या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट, या मेळाव्यामध्ये विविध प्रकारचे एकुण १०० स्टॉल असुन, ३४ हजाराच्या आसपास उलाढाल झाली असून, या म ेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली आहे,

या मेळाव्यात जामुन, समोसे, इडली, पकोडे, विविध प्रकारचे भाजी पाला, भेळ, समोसे, वडापाव, भजी पाव, पाणीपुरी, मसाला राईस, बिर्याणी, शेंगदाण्याचे लाडू, चहा, अशा अनेक स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते.



या मेळाव्याचे आयोजन शाळ-ेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे सर व शालेय समितीचे अध्यक्ष दादा पावले यांनी केले होते. या मेळाव्याला मार्गदर्शन व सहकार्य करणारे सर्व शिक्षक, गरुडे सर, कोठावळे सर, चौधरी सर, शिंदे सर,गावकरे सर, देशमुख सर, या बाल आनंद मेळाव्याला गावातील , पालक, तरूना वर्ग , महिला, व राजकीय नेते मंडळी, पत्रकार, यांची प्रामुख्याने उपस्थिति होती. या मेळाव्याला गावकऱ्यांनी भरभरून असा प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाला लक्ष्मण अडसूळ, सचिन गंभीरे, अमरसिंह आडसुळ, आनंत लंगडे, वल्लभ पोते, पत्रकार- अजित गायके, सुधाकर रणदिवे, राजू अडसूळ,संतोष गिरे, व शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष , उपाध्यक्ष व सदस्य, शाळेतील सर्व कर्मचारी वर्ग व विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .

**विजयामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य**

**हा विजय प्रत्येक लातूरकरांचा आहे : अमित देशमुख**

# भाजपचा 'भ्रम' फुटला, लातूरवर काँग्रेसचा 'हात'; सत्तेचा अहंकार लातूरकरांनी गाडला; अमित देशमुखांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : लातूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत आज लोकशाहीचा महा-निकाल लागला असून, मतदारांनी भारतीय जनता पक्षाचा सत्तेचा अहंकार पूर्णपणे गाडून टाकला आहे. गेल्या काही काळापासून लातूर हा भाजपचा नवा बालेकिल्ला आहे असा जो आभास निर्माण केला जात होता, तो भ्रम लातूरच्या जनतेने एका झटक्यात मोडीत काढला. आमदार अमित देशमुख यांच्या खंबीर नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वासा-ची मोहोर उमटवत लातूरकरांनी काँग्रेसला स्पष्ट बहुमत दिले असून, वंचित बहुजन आघाडीनेही या विजयात मोठी मुसंडी मारली आहे.



या निवडणुकीचा निकाल केवळ आकड्यांचा खेळ नसून तो लातूरच्या अस्मितेचा विजय मानला जात आहे. प्रचारादरम्यान भाजपच्या बड्या नेत्यांनी स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसून टाकण्याच्या वल्गना केल्या होत्या. मात्र, विलासराव हे लातूरच्या काळजात आहेत, हे मतदारांनी मतपेटीतून सिद्ध करून दिले. ७० जागांच्या या महापालिकेत काँग्रेसने एकहाती ४३ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे, तर दुसरीकडे सत्ताधारी भाजपला केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले. या निकालाने भाजपच्या स्थानिक नेतृत्वासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले असून अंतर्गत गटबाजीचा त्यांना मोठा फटका बसला आहे.

या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने ४ जागा जिंकत प्रस्थापित समीकरणांना धक्का दिला आहे. वंचितच्या या कामगिरीमुळे अनेक प्रभागांत भाजपच्या मतांचे गणित बिघडले, ज्याचा थेट फायदा काँग्रेसला झाला. माजी महापौर दीपक सूळ यांनी ५ हजारांहून अधिक मताधिक्य घेऊन मिळवलेला विजय हा काँग्रेसच्या लाटेची साक्ष देणारा ठरला. दुसरीकडे, भाजपने आपली संपूर्ण ताकद पणाला लावूनही त्यांना साध्या दुहेरी आकड्याच्या पुढे जाताना मोठी कसरत करावी लागली. अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांनी अत्यंत संयमी पण आक्रमकपणे बांधलेली संघटनात्मक बांधणी या विजयाचा मुख्य आधार ठरली.

या ऐतिहासिक विजयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना अमित देशमुख यांनी अत्यंत भावूक आणि खंबीर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, आजचा हा निकाल म्हणजे लातूरच्या स्वाभिमानी जनतेने सत्तेच्या अहंकाराविरोधात दिलेला कौल आहे. काही लोकांनी प्रचारात मर्यादा ओलांडून आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी पुसण्याची भाषा केली होती, पण लातूरकरांनी दाखवून दिले की साहेबांचे स्थान लोकांच्या मनात आहे आणि ते कोणीही पुसू शकत नाही. हा विजय माझा किंवा काँग्रेसचा नसून प्रत्येक लातूरकराचा आहे. आम्ही सत्त-ेचा वापर सेवा करण्यासाठी करू, तो माज दाखवण्यासाठी नाही. मतदारांनी जो विश्वास टाकला आहे, त्याला तडा जाऊ न देता लातूरच्या विकासाची गाडी आम्ही अधिक वेगाने पुढे नेऊ.

या महा-विजयामुळे केवळ लातूर शहरच नव्हे, तर संपूर्ण म राठवाड्यात काँग्रेस कार्यकर्त्यांम ध्ये नवे चैतन्य संचारले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ला-तूरचा हा निकाल भाजपसाठी धोक्याची घंटा, तर काँग्रेससाठी विजयाची मोठी नांदी ठरली आहे.

# वागदरी जिल्हा परिषद गटात काँग्रेसला मोठे खिंडार; आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलणार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा वागदरी जिल्हा परिषद गट काँग्रेससाठी हादरवून टाकणारा ठरला आहे. वागदरी परिसरातील काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते व प्रमुख नेत्यांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या प्रभावी नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या घटनेमुळे वागदरी गटात काँग्रेसला मोठे खिंडार पडले असून भाजपाची ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे.

अक्कलकोटचे माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी काँग्रेसला रामराम ठोकत शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर काँग्रेसला हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे. वागदरीसारख्या परंपरागत काँग्रेसच्या प्रभावी भागात घडलेल्या या घडामोडीने तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी, उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये वागदरीचे माजी सरपंच रवी किरण वरनाळे, डॉ. शरण वरनाळे, माजी सरपंच श्रीकांत भैरामडगी, शिवराज मंत्री पोमाजी, अल्पसंख्यांक समाजातील नेते इस्राईल नदाफ, माजी सरपंच व जिल्हा परिषद सदस्य विजय ढोपरे, शंकर घुगरे, विकास नंजुडे, सिद्धारूढ धड्डे, श्रीशैल पोमाजी, सुभाष शिरगण ,बाबू मोरे, गणेश शिंदे, शिवाजी सावंत, परमेश्वर मोहरकर, आप्पासाहेब मुल्ला, सुनील शिरगण,प्रभू स्वामी, उपसरपंच पंकज सुतार, यावेळी भारतीय जनता पार्टी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

हा पक्षप्रवेश सोहळा आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी युवा नेता बसवराज शेळके प्रदीप जगताप माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, अप्पू बिराजदार प्रदीप पाटील सुनील सावंत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्यासह वागदरी जिल्हा परिषद गटातील असंख्य प्रमुख नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी म्हणाले, वागदरी गटाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजप कटिबद्ध आहे. सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवणे, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही एकजुटीने काम करू.

दरम्यान, काँग्रेसमधून होत असलेले सततचे पक्षांतर आणि कार्यकर्त्यांची गळती पाहता आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजप अधिक भक्कम स्थितीत जाण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. वागदरी गटातील या मोठ्या राजकीय घडामोडीकडे संपूर्ण अक्कलकोट तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# भिवंडीत भूमिपुत्र एल्गार संघटनेचा दणका; ८ वर्षांपासून गुलामगिरीत असलेल्या कातकरी वेठबिगाराची सुटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील एका वीटभट्टीवर गेल्या ८ वर्षांपासून अमानवीय परिस्थितीत वेठबिगारी करणाऱ्या दिनेश सुरेश भोईर या कातकरी आदिम जमातीच्या तरुणाची 'भूमिपुत्र एल्गार संघटने'च्या कार्यकर्त्यांनी यशस्वी सुटका केली आहे. याप्रकरणी गणेशपुरी पोलीस ठाण्यात रात्री (१५ जानेवारी) उशिरा वीटभट्टी मालकावर कठोर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, संघटनेच्या या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. केवळ बयाना दिला म्हणून नाही तर जिथे खरच शोषण होत आहे, अत्याचार होत आहे तिथे भूमिपुत्र एल्गार संघटना कायद्याचा दणका देणारच अशी भूमिका संघटनेने घेतली आहे.

दिनेश भोईर हा तरुण गेल्या ८ वर्षांपासून कल्पेश सूर्यकांत पाटील याच्या वीटभट्टीवर कामाला होता. अवघ्या ७५ हजार रुपयांच्या आगाऊ रकमेच्या (बयाणा) बदल्यात त्याला वेठबिगार बनवण्यात आले होते. गेल्या अनेक वर्षांपासून त्याचे आर्थिक आणि मानसिक शोषण सुरू होते. मालकाने त्याला मारहाण करून पत्नीला वारंवार कॉल करून बोलावत असल्याने हतबल झालेला दिनेश आत्महत्येच्या टोकाला पोहोचला होता. याबाबतची माहिती मिळताच भूमिपुत्र एल्गार संघटनेचे सरचिटणीस नवनाथ भोये आणि कातकरी युवा कार्यकर्ती मृणाली पवार यांनी तत्काळ पुढाकार घेऊन दिनेश भोईर याची मदत केली. कार्यकर्त्यांनी या घटनेबाबत गणेशपुरी पोलिसांना सविस्तर माहिती दिली. पोलिसांनी या घटनेची प्रत्यक्ष पडताळणी करून जे काही कायदेशीर असेल त्याप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने लावून धरली. त्यानंतर पोलिसांनी वस्तुस्थिती तपासून गुन्हा दाखल केला आहे. याबाबतच्या कॉल रेकॉर्डिंग देखील दिनेश याने समोर आणल्या आहेत. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी वीटभट्टी मालकावर खालील कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे: भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३: कलम ११५(२), ३५२, ३५१(२) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९: कलम ३(२)(रिं), ३(१)(ी), ३(१)(ी) वेठबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६: कलम १६, १७, १८ दाखल करण्यात आले आहे.

दिनेश भोईर हा भूमिपुत्र एल्गार संघटनेने मुक्त केलेला पहिला वेठबिगार असून, केवळ सुटका करून आम्ही थांबणार नाही. शासनाकडे पाठपुरावा करून त्याचे योग्य पुनर्वसन आणि त्याला पूर्ण कायदेशीर न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आदिवासी मजूर बांधवांना रोजगार मिळायला हवा आणि स्थानिक वीटभट्टी मालक जे प्रामाणिकपणे व्यवसाय करतात त्यांचा व्यवसाय सुद्धा सुरू रहावा मात्र जिथे जिथे असे मारहाण आणि शोषणाचे प्रकार घडतील त्याच प्रकरणात आम्ही गुन्हा दाखल करण्याची भूमिका घेऊ, हा गुन्हा देखील केवळ बयाना रक्कमेचा नाही तर शोषणाचा आहे म्हणून दाखल झाला असल्याची माहिती भूमिपुत्र एल्गार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पवार आणि कार्याध्यक्ष सुनील लोणे यांनी दिली आहे. सदर घटनेचा पुढील तपास गणेशपुरी उपविभागीय पोलीस अधिकारी करत आहेत.

# कळंब येथे साने गुरुजी कथामालेच्या वतीने पुरस्कार प्राप्त सुरेश टेकाळे, महादेव खराटे, गिरीश कुलकर्णी यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा कळंब च्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर बालकाश्रम कळंब येथे ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला आयोजित बेळगांव ( कर्नाटक ) येथील राष्ट्रीय अधिवेशनात कळंब येथील धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व भाई नारायणराव लोमटे माध्यमिक विद्यालय भाट शिरपुरा येथील शाळेचे मुख्याध्यापक सुरेश टेकाळे यांना राष्ट्रीय शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष गिरीश कुलकर्णी यांचा राष्ट्रीय संस्कार दूत पुरस्काराने सन्मान करण्यात आला तसेच शिव व्याख्याते, महादेव खराटे यांना संजीवनी फाउंडेशन नाशिक या संस्थेचा शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांनी शिक्षण, सामाजिक, क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला.

मकर संक्रांति निमित्त तिळगुळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला, कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, यांची उपस्थिती होती या कार्यक्रमात देवधानोरा येथील स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य महादेव गपाट, मुख्याध्यापक संभाजी गिड्डे, कन्हेरवाडी जि.प. प्राथमिक शाळेचे बी.एन. भंडारे, जि.प. प्रशाला कळंब सहशिक्षक अशोक शिंपले, अच्युत उर्फ बाबुराव पौळ, सहशिक्षक रमेश शिंदे, सहशिक्षक प्रदीप यादव बालक आश्रम संचालिका सरस्वती अडसूळ, कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ , अभा साने गुरुजी कथामालेचे कळंब तालुका अध्यक्ष सोपान पवार यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधवसिंग राजपूत यांनी केले तर सूत्रसंचलन प्राचार्य महादेव गपाट यांनी व आभार सोपान पवार यांनी मानले.

# जि. प. प्राथमिक शाळा, देवधानोरा येथे बाल आनंद मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे, : कळंब तालुक्यातील देवधानोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या मेळाव्याचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे तसेच शिकताना आनंदाचा अनुभव देणे हे होते.



या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पदार्थ व वस्तू विक्रीस ठेवून व्यवहारज्ञानाचा अनुभव घेतला. लहानग्यांच्या उत्साहामुळे संपूर्ण शाळा परिसर आनंदाने फुलून गेला होता.

मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या पाल्यांना प्रोत्साहन दिले. ग्रामस्थांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

या बाल आनंद मेळाव्यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रकारचे स्टॉल उभे केले होते. या मेळाव्यात पकोडे, विविध प्रकारच्या भाज्या व भाजीपाला, जामुन, समोसे, इडली, वडापाव, भजी, भेळ, आप्पे, पाणीपुरी, मसाला राईस, कोबी मंचुरियन, बिर्याणी, पोहे, शेंगदाण्याचे लाडू, तिळाचे लाडू, बासुंदी, खाऊ, खारमुरे, फुटाणे, मसाला इत्यादी अनेक स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलना पालक व ग्रामस्थांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या बाल आनंद मेळाव्यात १८७५० रुपयाची उलाढाल झाली.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. लवटे मॅडम, कराड मॅडम, मुंडे सर, श्री. कुंभार सर, श्री. बांगर सर, सुरवसे सर तसेच श्री. पाळवदे सर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मेहनतीमुळे, नियोजनामुळे व मार्गदर्शनामुळे बाल आनंद मेळावा अत्यंत शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण, सर्जनशीलता व आत्मविश्वास वाढीस लागला असून हा मेळावा सर्वांच्या मनात आनंदाची सुंदर आठवण ठरला.

**स्वीकृत सदस्य म्हणून लक्ष्मण शिरसाट, अँड सुनील वाळूजकर, सौरभ थिटे, तर तीर्थक्षेत्र विकासासाठी कडून विक्रम शिंदे यांची निवड**

# पंढरपूर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी महादेव धोत्रे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगर परिषदेच्या उपनणाऱ्याचे परिचारकांच्या पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीचे नगरसेवक महादेव धोत्रे यांची प्रचारकांच्या नेतृत्वाखाली भाजप व विकास आघाडी स्वीकृत सदस्य म्हणून श्री लक्ष्मण शिरसाठ, अँड सुनील वाळूजकर, सौरभ थिटे यांची निवड करण्यात आली. तसेच तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून श्री विक्रम शिंदे नाईक यांची निवड करण्यात आले.



पंढरपूर नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा नगरपालिका सभागृहामध्ये शुक्रवारी दिनांक १६ रोजी पालिकेच्या सभागृहामध्ये संपन्न झाली. पालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता भालके या सभेसाठी पीठासन अधिकारी म्हणून उपस्थित होत्या यावेळी पालिकेचे मुख्य अधिकारी डॉक्टर महेश रोकडे तसेच पालिकेचे इतर अधिकारीही उपस्थित होते.

दरम्यान पंढरपूर नगरपालिकेमध्ये परिचारकांच्या शहर विकास आघाडी व भाजप २४ नगरसेवक निवडून आलेले होते तर विरोधी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे ११ नगरसेवक निवडून आलेली होते. यामध्ये विशेष बाब म्हणून तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉक्टर प्रणिता भालके प्रचंड मतांनी निवडून आल्या.

दरम्यान शुक्रवार दिनांक १६ रोजी पार पडलेल्या पहिल्या सभेमध्ये भाजप पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे नगरसेवक महादेव धोत्रे यांना उपनारेष्य पदासाठी एक मताने त्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर धोत्रे यांनी उपनारक्षपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उपनिष्परासाठी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे विरोधी गटाकडून एकही अर्ज दाखल न केल्यामुळे त्यामुळे पीठासन अधिकारी व नगरपालिका नगराध्यक्ष डॉक्टर प्रणिता भालके यांनी श्री माधव धोत्रे यांची उपनारेषपदी निवड जाहीर केली,

उपनावश्य पदाची निवड होणार असल्याने परिचारक व भाजप शहर विकास आघाडी यांच्या कार्यकर्त्यांनी नगरपालिकेसमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करत गुलाबाची उधळण व फटाक्याची आताच बाजी करत जल्लोष करण्यात आला.

त्यानंतर पालिकेत माजी आमदार प्रशांत परिचारक व पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे प्रमुख तथा शुगरचे सर्वेसर्वा उमेश परिचारक, महादेव धोत्रे व स्वीकृत तीन नगरसेवकाचे पेढे भरून त्यांचे पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांची निवड झाल्यानंतर भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गटनेते भागवत बडवे व सुजित सर्व गोड भारतीय जनता पार्टी व पंढरपूर मंगळाचे विकास आघाडीचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.

**स्वीकृत सदस्यांची देखील अभिनंदन केले**

**परिचारिकांच्या नेतृत्वाखाली भाजप व पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे स्वीकृत सदस्य म्हणून श्री लक्ष्मण पापरकर, अँड सुनील वाळूजकर, सौरभ थेटे, यांची देखील निवड करण्यात आली. व त्यांचा माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते त्यांचाही सत्कार करण्यात आला.**

# मंगळवेढ्यात पहिल्या दिवशी जिल्हा परिषद साठी ३२ तर पंचायत समितीसाठी १५ नामनिर्देशन पत्राची झाली विक्री



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढ्यात पहिल्या दिवशी जिल्हा परिषद साठी ३२ तर पंचायत समिती साठी १५ नामनिर्देशन पत्रांची विक्री झाली.

मंगळा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती पंचवार्षिक निवडणुकीची निवडणूक आयोगाने नुकतीच घोषणा केली असल्याने दिनांक १६ पासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ झाला असून पहिल्या दिवशी जिल्हा परिषदेसाठी ३२ व पंचायत समितीसाठी १५ नाम निर्देशन पत्राची विक्री झाली असल्याची माहिती पंचायत समितीच्या घटविकास अधिकारी जस्मिन शेख यांनी दिली.

निवडणूक आयोगाने येथील केलेल्या नियमाप्रमाणे दिनांक १६ पासून उमेदवार भरण्यास प्रारंभ झाला आहे. मात्र पहिल्या दिवशी एकही उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला नाही या निवडणूक रिंगणात कोण कोण अर्ज भरणार याकडे तालुक्यातील तमाम मतदारांची लक्ष लागून राहिले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा शुक्रवार शुभ असल्याने नामनिर्देशन फॉर्म घेण्यासाठी उमेदवारांनी पंचायत समितीमध्ये मोठी गर्दी केल्याचे दिसून येत होते.